# उदारीकरणाचा भारतीय शेतीवर झालेला परिणाम

**कु. गायत्री तावडे**
**B. A |||( अर्थशास्त्र)**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.**

**गोषवारा**:- अर्थव्यवस्थेतील शासकीय हस्तक्षेप व नियंत्रण[ कमी करण्याकडे कल असणाऱ्या आर्थिक धोरणांचा अवलंब करणारी उदारीकरण ही प्रक्रिया असे समजले जाते. या प्रक्रियेत औद्योगिक सुधारणा,शेतीमध्ये घडणारे बदल,कर सुधारणा,नियोजनातील सुधारणा,बँकेत सुधारणा अशा विविध सुधारणा राबवून भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे संरचनात्मक बदल घडत आहे. अशा बदलातून अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्रावर झालेला परिणाम आपण पाहणार आहोत.

**सूचक शब्द :** :- उदारीकरण, शेती,शिथलीकरण,मुक्त अर्थव्यवस्था

**प्रस्तावना:**- आपण विविध विचारसरणी व आर्थिक संबंधांच्या अतिशय गुंतागुंतीच्या जगात राहत आहोत. अशावेळी दारिद्र्य निर्मूलनाशी जोडल्या गेलेल्या शेतीच्या उदारीकरण सारख्या संवेदनशील प्रश्नांकडे केवळ अर्थशास्त्रीय दृष्टिकोन बाळगून आपली भूमिका ठरवणे हे बाळबोधाचे ठरेल. आपले राजकीय भान जागृत पाहिजे. परंतु तरी देखील आर्थिक विकास संदर्भातील संकल्पनात्मक चौकटीची आपल्याला सत्याच्या जवळ जाण्यास मदत होऊ शकेल.

**उदारीकरणामुळे घडून आलेल्या बदल**:-

- कर सुधारणा मोठ्या प्रमाणात करण्यात आली
- 1991 मधील38.5% वरून ऑक्टोंबर 2018 मध्ये 19.5% वैधनिक रोखता प्रमाण आणले.
- नियोजन सुधारणा
- औद्योगिक सुधारणा:-1991 मध्ये नवीन FEMA कायदा करण्यात आला. सध्या त्यावर नियंत्रण ठेवण्याऐवजी स्पर्धात्मक वाढण्यावर परत देण्यात आला.' मेक इन इंडिया' सुरू करण्यात आले .

**स्पष्टीकरण/ व्याख्या**:- समाजवादी अर्थव्यवस्थे मध्ये सरकारचे नियंत्रण कमी करणे म्हणजे उदारीकरण होय. शासकीय बंधने शिथिल करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे**:-1]उदारीकरणामुळे भारतीय शेतीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

2] उदारीकरण व भारतीय शेतीतील सहसंबंध अभ्यासणे.

संशोधन पद्धत :- उदारीकरणाचा भारतीय शेतीवर झालेला परिणाम या संशोधन पेपर मध्ये मी दुय्यम तथ्याचा वापर करून संशोधन केले आहे.

**तथ्य संकलन**:- प्रत्येक गोष्टीचे आपल्याला चांगले आणि वाईट असे दोन्ही परिणाम दिसून येतात.त्याचप्रमाणे उदारीकरणाचा भारतीय शेती वर झालेला परिणाम पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

**चांगले परिणाम:-**

**1] आर्थिक स्थिरता-**: देशातील जनतेला आर्थिक स्थिरता प्राप्त करून देण्यासाठी कृषीची भूमिकाही अत्यंत महत्त्वाचे आहे. प्राध्यापक गुन्नार मिर्डाल यांनी जगातील विकसित आणि विकसनशील देश त्यांच्यातील आर्थिक विषमता ची कृषी वरील अवलंबून राहण्याचा प्रमाणात वाढ झाल्यामुळे वाढते अशा आशयाचे विचार व्यक्त केले होते. ग्रामीण भागातील लोकांना उदारीकरणामुळे आर्थिक स्थिरता प्राप्त करून शेतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

2] **निर्यातीस प्रोत्साहन:-**

तक्ता क्रमांक 1 :- निर्यातीमध्ये मध्ये झालेली वाढ

| | Rate |
|---|---|
| 1991 | 17.7 |
| 1992 | 35.3 |
| 1993 | 21.9 |
| 1994 | 18.5 |
| 1995 | 28.6 |
| 1996 | 11.7 |
| 1997 | 9.5 |
| 1998 | 7.4 |
| 1999 | 13.8 |
| 2000 | 26.6 |
| 2001 | 3.8 |
| 2002 | 22.1 |
| 2003 | 15.0 |
| 2004 | 27.9 |
| 2005 | 21.6 |
| 2006 | 25.3 |
| 2007 | 14.7 |
| 2008 | 28.2 |
| 2009 | 0.6 |
| 2010 | 34.5 |
| 2011 | 28.9 |
| 2012 | 11.5 |
| 2013 | -0.5 |
| 2014 | -9.5 |
| 2015 | 7.8 |
| 2016 | 5.8 |

| | |
|---|---|
| 2017 | 18.0 |
| 2018 | -3.8 |
| 2019 | -1.4 |
| 2020 | -12.5 |

Source :- Economic Survey 2020-21 Statistical Appendix
Note:- 1991to 2020 export:- rate of exchanging

उदारीकरणामुळे मोठ्या प्रमाणात शेतीमधील मालाला प्रोत्साहन मिळून मालाची निर्यात वाढू लागली. तक्ता क्रमांक 1:- यामध्ये 1991ते 2020 निर्यातीचा दर दर्शवला आहे. आपण पाहू शकता निर्यातीच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. प्रस्थापित निर्यातदारांना विदेशी चलनातील खाते व्यवस्थित ठेवण्याची परवानगी देण्यात आली .तसेच त्यांच्या व्यापारी खात्यासाठी विदेशी कर्ज उभारण्यास परवानगी देण्यात आली. विशेष आर्थिक क्षेत्राचा ( सेझ) निर्मिती करून त्याद्वारे निर्यात वाढविण्यात आली.

3] **उद्योगाकरिता कच्च्या मालाचा पुरवठा**:-कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात शेतीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. उद्योगांमध्ये तर शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण गहू, तांदूळ, कापूस,भुईमूग, ऊस, बटाटे भाजीपाला, कांदे, प्रक्रिया उद्योग,सूर्यफूल,तुर,ज्वारी,बाजरी मूग अशा अनेक पिकांवर आधारित भारतात उद्योग कार्यरत आहे. अशा उद्योगांना कृषी प्रक्रिया उद्योग असेही म्हणतात. भारतीय उद्योगासाठी लागणाऱ्या कच्चा मालाचा पुरवठा या उद्योगापासून होतो त्यामुळे उद्योगासाठी कच्च्या मालाचा पुरवठा करणारा स्रोत म्हणून भारतीय कृषी चे महत्व सांगता येईल. त्याचप्रमाणे हा कच्चामाल वाढण्यामध्ये उदारीकरणाचा वाटा आहे.

4]**आंतरिक व्यापाराचा आधार** -व्यापाराचे अंतर्गत व्यापार आणि बाह्य व्यापार असे दोन प्रकार पडतात .बाह्य व्यापारामध्ये दुसऱ्या देशाशी होणाऱ्या व्यापार यांचा समावेश होतो. अंतर्गत व्यापार हा देशातील सीमारेषा मध्ये चालत असतो. भारतीय कृषी वर अवलंबून असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात सोबत शेतीपासून उत्पादित होणाऱ्या शेतमालाच्या विक्रीच्या अनुषंगाने कार्यरत लोकसंख्येचा विचार करणे आवश्यक ठरते. खरेदी विक्री चा जागा म्हणजे बाजार पेठ असे म्हणतात. आणि उदारीकरणामुळे या बाजारपेठांना मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. शेतकऱ्यांचा माल मोठ्या प्रमाणात या बाजारपेठांमध्ये विकार विकला जाऊ लागला.

**वाईट परिणाम**:-

1]**स्पर्धात्मक परिस्थिती**:- शेतकऱ्यांनी उत्पादन घेत असताना वेगवेगळ्या उत्पादनावर भर देणे आवश्यक आहे. सर्वच शेतकऱ्यांनी एकाच वस्तूचे उत्पादन केल्यास शेती उत्पादनाचा पुरवठा वाढतो आणि मागणी कमी राहते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालास भाव मिळत

नाही. आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे स्पर्धात्मक परिस्थिती टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**2]उत्पादनात बाबत अनिश्चितता** :-उत्पादनातील चढ-उतारामुळे व्यवसाय अनिश्चितता निर्माण होते. उत्पादन वाढले तर किंमत कमी होते आणि उत्पादन कमी झाले तर किमतीमध्ये नेहमीपेक्षा अधिक वाढते हा अर्थशास्त्रातील नियम आहे. उत्पादनामध्ये होणारे चढ-उतार आणि त्यामुळे निर्माण होणारे अनिष्ट दूर करण्यासाठी शेतकरी पर्यायी स्वरूपाचे उत्पादन घेऊ शकतो.

**3]करार पद्धती** :- शेतीमध्ये लागवड करताना शेतीमधून प्राप्त होणाऱ्या अपेक्षित उत्पन्नाचा अंदाज घेऊन जमिनदार, मध्यस्थ, अडते, व्यापारी यांच्याशी पीक पूर्व कराड केलास पिकाच्या संदर्भातील अनिश्चितता आणि उत्पन्न याबाबत काही प्रमाणात आर्थिक सुरक्षितता मिळू शकते. करार पद्धती शेतीतील अनिश्चित दूर करण्याची महत्त्वाची पद्धत आहे. करार हे वस्तू उत्पादन संदर्भात, खिशातील उत्पन्नाच्या संदर्भात असू शकतात त्यामुळे योग्य करार केले पाहिजे.

**[4] साधनांची अनिश्चितता**

**5] पिक विमा**

**निष्कर्ष:**-1] उदारीकरणाचा शेतीवर चांगला परिणाम आपल्याला दिसून येतो.

2] त्याचप्रमाणे सरकारने निर्यातीस प्रोत्साहन दिलेले आपल्याला दिसून येते.

3] उदारीकरणा मध्ये काही सुधारणा केल्या पाहिजे त्याचा परिणाम भारतीय शेतीवर मोठ्या प्रमाणात दिसून येईल.

**संदर्भसूची** :-


- economics Survey 2020-21 statistical appendix
- शेती अर्थशास्त्र- डॉ.गंगाधर पाटील
- Research paper- प्राध्यापक डॉ.डी. जी पाटील
- http://farmer.gov.in
- www.nitinsir. in>s
- http://tractorbuyersguide.in
- http://www.indiaagrijobs.com
- http://india.gov.in/topics/agriculture